माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५३८**

**अपिलार्थी श्री. राकेश बगोरिया**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक**
नगर भूमापन अधिकारी, वांद्रे यांचे कार्यालय, महसूल भवन, ४ था व ५ वा मजला,
वांद्रे स्टेशनच्या बाजूला, बस डेपो समोर, वांद्रे (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी**
नगर भूमापन अधिकारी, वांद्रे यांचे कार्यालय, महसूल भवन, ४ था व ५वा मजला,
वांद्रे स्टेशनच्या बाजूला, बस डेपो समोर, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०० ०५०

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०७.२०२४ | १८.०७.२०२४ | १२.०८.२०२४ | ३०.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १८.०७.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ३०.०९.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. ०९.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) Please provide me a certified copy of government resolution, notification, circular and any other government records regarding property card is a document (proof) of title (ownership) of government (leasehold) land in maharashtra.*

*(२) Please provide me a certified copy of government resolution, notification, circular and any other government records regarding revenue record is a document (proof) of title (ownership) of government (leasehold) land in maharashtra.*

*(३) Please provide me a certified copy of government resolution, notification, circular and any other government documents which stipulated lease holder for lease land (Tenure B) during lease period became a land owner of leasehold land in maharashtra.*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०७.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, सर्व प्रकारच्या मालकी हक्काचे अभिलेख म्हणजेच मिळकत पत्रिका जनतेसाठी नगर भूमापन क्रमांकाच्या मिळकत पत्रिका http:/digitalsatbara.mahabhumi.gov.in/DSLR या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. आपणस आवश्यक तर सदर मिळकतीची मिळकत पत्रिका सदर संकेतस्थळावरुन ऑनलाईन प्राप्त करुन घेणेस विनंती आहे. तसेच आपण मालकी हक्क बाबत नगर भूमापन क्रमांक पुरविल्यास आपणांस सदर मिळकतीची माहिती पुरविणेस येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोजित प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असल्याने त्यांना अपील अर्जाबाबत स्वारस्य दिसून येत नाही तसेच अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे नमुद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०९.२०२४ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे अधिवक्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०४.०३.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, *The First Appellate Authority, by order dated 30.09.2024, dismissed the appeal mainly on the ground that Government Resolutions are available on Government websites and that the Appellant was absent during hearing. The absence of the Appellant cannot be a ground to reject the appeal. The appeal must be decided on merits. The FAA did not examine whether the PIO actually supplied the requested Government Resolutions or not. Instead, the order merely repeats that GRs are available online. The FAA did not record whether any specific GR relating to property card as proof of title exists. Therefore, the appellate order is non-speaking and arbitrary. It is important to note that property card and revenue records are frequently relied upon in civil and revenue proceedings. However, whether they constitute proof of ownership of Government leasehold land is a legal question governed by statutory provisions and Government policy. The Appellant seeks transparency and clarity through official documents. This is in larger public interest because many citizens rely upon property cards believing them to be title documents. If the Government has issued any circular clarifying their status, the same must be disclosed. If no such circular exists, that fact must be clearly stated. The RTI Act promotes transparency and accountability. Therefore, proper disclosure is necessary.*

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २०.०२.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना विहित मुदतीत उत्तर दिलेले आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी आयोगास पुढे सादर केले की, अपिलार्थींनी विचारलेली माहिती माहितीच्या व्याख्येत येत नाही. उदा. मुद्दा क्र. ३ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. तसेच अपिलार्थींनी त्यांना कोणते शासन निर्णय किंवा परिपत्रक पाहिजे याविषयी काही नमुद केलेले नाही.

..३/-

७. जन माहिती अधिकारी यांनी मिळकत पत्रिका विषयी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीचा संदर्भ देऊन अपिलार्थींना स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक उत्तर आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने कळवावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

5-3-2026

**मुंबई**
**दिनांक : ०५.०३.२०२६**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**